# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ 4704 /२०१९ पुणे शहर, दिनांक २१/०५/२०१९

**विषय :- वाहतुक नियमभंग करणा-या वाहनचालकांना तडजोड रक्कम रोखीने भरण्याची सुविधा उपलब्ध केले बाबत.**

---

पुणे शहर वाहतुक पोलीसांनी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणा-या वाहन चालकांवर कारवाई करण्यासाठी ई-चलन कार्यप्रणालीचा वापर करण्यात येत आहे. पुणे शहर वाहतुक शाखेकडील कारवाई ही कॅशलेश करण्यात आलेली आहे. काही वाहनचालकांना डेबीट,क्रेटीड कार्ड उपलब्ध नसल्यानंतर अथवा ऑनलाईन बॅंकीग सुविधेबाबत माहिती नसते. अशा वाहनचालकांना रोख स्वरुपात तडजोड रक्कम भरणा करण्यासाठी खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

ई-चलनाद्वारे कारवाई झाल्यानंतर वाहनचालकास ई-चलन मशिनद्वारे अनपेड चलनाची प्रिन्ट अथवा त्यांच्या मोबाईलमध्ये संदेश दिला जातो. असा संदेश प्राप्त झाल्यानंतर त्या वाहनचालकाने सदरच्या संदेशामध्ये /चलनामध्ये दर्शविण्यात आलेली तडजोड रक्कम ही पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा, पुणे शहर यांचे नावे असलेले एसबीआय बैंकेतील चालू खाते क्रमांक ३६८१९८४५८४१ यावर पुणे शहरामध्ये उपलब्ध असलेल्या एसबीआय बैंकेच्या कोणत्याही शाखेमध्ये जावून रोख स्वरुपात असणारी तडजोड रक्कम भरणा करावी. भरणा केल्या नंतर बैंकेकडून मिळालेली पावती घेवून ती वाहतुक नियंत्रणकक्ष पुणे शहर येथे वाहनचालकाने स्वतः येवून त्यांनी तडजोड रक्कम भरणा केलेल्या वाहनाचा आरटीओ नंबर अथवा वाहनाचा चॅसी नंबर देवून झालेली कारवाई पुर्ण करतील. जे वाहनचालक तडजोड रक्कम भरणा केल्यानंतर त्यांच्या वाहनाची व भरणा केलेल्या रक्कमेची माहिती ही वाहतुक नियंत्रण कक्ष येथे कळविणार नाहीत त्यांची चलन भरणा प्रक्रिया ही पुर्ण होणार नाही. त्याकरीता त्यांनी रक्कम भरणा केल्यानंतर पोलीस उप आयुक्त कार्यालयात रोखपाल यांना माहिती देणे आवश्यक आहे.

तरी रोख स्वरुपात भरणा करणारे वाहनचालकांकरीता उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधे बाबत वाहनचालकांनी सदरची माहिती प्राप्त करुन घेणे बाबत वाहतुक शाखा पुणे शहर कडून वाहनचालकांना आवाहन करण्यात येत आहे.